## प्रेस नोट दिनांक - २३/०३/२०१९

---

### मोबाईल फोन हिसकावणारा सराईत गुन्हेगार व दुचाकी वाहने चोरणारे दोघे जेरबंद चार गुन्हे उघड

---

श्री. रणजित बंडु फुलसुंदर वय - २४ रा–हिंगणे होम कॉलनी कोथरुड पुणे हे हेक्ट्रानेट प्रायव्हेट लिमिटेड बाणेर पुणे या कंपनीत **सॉफ्टवेअर इंजिनियर** म्हणुन नोकरीस आहे. दिनांक – २७/०२/२०१९ रोजी १२/१५ वा चे सुमारास ते वारजे ब्रीज जवळ बसमधुन उतरुन पायी पायी घरी जात असताना एनडीए रोड सावित्री निवास समोर आले त्यावेळी तीन अनोळखी इसम बुलेट या मोटार सायकलवरुन आले व त्यांना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांचे जवळील नऊ हजार रुपये किंमतीचा रेडमी कंपनीचा मोबाईल फोन जबरदस्तीने चोरुन नेला होता. त्याबाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे गु र नं–८८/२०१९ भा. दं. वि. कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हददीत पेट्रोलिंग करुन वेगवेगळया पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुन्हयातील फरारी व पाहीजे आरोपींचा शोध घेत होते. पोलीस नाईक रामदास गोणते यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या माहीतीनुसार पोलीसांनी चांदणी बार उत्तमनगर अचानक चौकाजवळ पुणे येथे सापळा लावुन संशयीत आरोपी नामदेव ऊर्फ राज शंकर राठोड वय - २२ रा - मासे आळी पार्वेती हाईटस उत्तमनगर शिवणे पुणे यास पकडले आहे. त्याचेकडे पोलीसांनी कसुन सखोल तपास केला त्यावेळी त्याने त्याचा मित्र अभिषेक ननावरे व अजिंक्य पुणे नाव माहीत नाही असे तिघांनी मिळुन गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. **त्याचे ताब्यातुन गुन्हयातील नऊ हजार रुपयेचा रेडमी कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आलेला आहे**. फरारी आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

दरम्यान दिनांक – २१/०३/२०१९ रोजी पोहवा संतोष क्षीरसागर व पोलीस नाईक संदीप तळेकर यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या माहीती वरुन पुणे शहरात वेगवेगळया भागामध्ये दुचाकी वाहने चोरी करणारा संशयीत निलेश ऊर्फ निलकंठ बाळासाहेब भोसले वय-२० रा - मुपो – शिरवळ ता – खंडाळा जिल्हा - सातारा व अल्पवयीन मुलगा यास शिंदे पुल एनडीए रोड उत्तमनगर पुणे याठिकाणी सापळा लावुन पकडण्यात आलेले आहे. त्यांचे ताब्यातुन एक पल्सर मोटार सायकल व एक ज्युपिटर मोपेड जप्त करण्यात आलेली आहे व भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे गुरनं–२४९/२०१९ व २५१/२०१९ हे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच संशयीत इसम चंद्रशेखर विठोबा ठोंबरे वय - २१ रा - संतोष नगर कात्रज पुणे यास कात्रज पुणे येथे पकडण्यात आले आहे. त्याचे ताब्यातुन साठ हजार रुपये किंमतीची एक बजाज पल्सर मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे व हडपसर पोलीस स्टेशन पुणे गुरनं १८५/२०१९ हा गुन्हा उघडकीस आलेला आहे. आरोपींकडुन एकुण **एक लाख दहा हजार रुपयेची तीन दुचाकी वाहने जप्त करण्यात आलेली आहे व तीन वाहनचोरीचे तीन गुन्हे उघडकीस आलेले आहे.**

सदरची कामगिरी श्री. शिरीष सरदेशपांडे पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर, श्री. समीर शेख सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस निरीक्षक दिपक निकम व पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, अजय म्हेत्रे, किरण अडागळे आणि गुन्हे शाखा युनिट तीन पथकातील पोलीस कर्मचारी सपोफौ अनिल शिंदे, सपौफौ दिपक मते, सपौफो दत्तात्रय गरुड आणि पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, संदीप तळेकर, रामदास गोणते, शकील शेख, गजानन गानबोटे, मच्छिंद्र वाळके, रोहीदास लवांडे, विल्सन डिसुझा, सुजीत पवार, कैलास सांळुके, यांनी केलेली आहे.